# AGMARKNET Workshops in Maharashtra by NIC Mumbai.

NIC Maharashtra State Centre Mumbai is executing AGMARKNET Project in Maharashtra. Under phase-I & II of this project, 64 Agriculture Produce Market Committees (APMCs) have been computerised and under phase III of AGMARKNET Project, 100 APMCs are being computerised.

As a part of AGMARKNET project, NIC Maharashtra State Centre Mumbai has conducted 10 workshops for the officers and staff of Agriculture Produce Market Committees (APMCs) at Raigad, Nashik , Beed and Yavatmal district of Maharashtra during November-December 2004.

First batch of workshop was started at Alibag (Raigad ) from 22-11-2004 to 24-11-2004 which was inaugurated by SIO Maharashtra. In the series of 10 workshops the last batch was conducted at NIC Yavatmal on 27-12-2004 to 29-12-2004.

During above workshops, lectures and practical were conducted on basics of computer, e-mail and Internet, Lotus SmartSuit, AGMARKNET data reporting software and AGMARKNET Portal. Total 200 staff/Officers of APMCs have participated in these 10 workshops.

Video conferencing was also conducted between NIC Mumbai and NIC Nashik and NIC Beed in which Sh. Moiz HussainAli SIO Maharashtra interacted with participants during the workshop.

## Photo Gallery:

### AGMARKNET Workshop at NIC Raigad

| | |
|---|---|
|   |   |
| SIO Maharashtra inaugurating workshop at Raigad | SIO delivering speech at NIC Raigad |

## AGMARKNET Workshop at NIC Nashik



Inauguration of workshop at NIC Nashik



Inauguration of workshop at NIC Nashik

## AGMARKNET Workshop at NIC Beed



Inauguration of workshop at NIC Beed



Collector Beed delivering speech at NIC Beed

## AGMARKNET Workshop at NIC Yavatmal



SIO Maharashtra delivering speech at NIC Yavatmal



Collector Yavatmal delivering speech at NIC Yavatmal

| | |
|---|---|
|  |   |
| SIO with participants at NIC Yavatmal | All Participants of workshop at NIC Yavatmal |

## Press Coverage :

### 1) AGMARKNET Workshop at NIC Raigad.

Inauguration of **AGMARKNET Workshop** by Addl. District Collector Shri Subhash Dumbare on 22-11-2004 at NIC Raigad printed in Marathi daily **RATNAGIRI TIMES (Raigad Edition) dt. 23-11-2004.**

# कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये संगणकीकरणांचे उद्‌घाटन

अलिबाग, २२ नोव्हें. (प्रतिनिधी)- कृषी उत्पन्न बाजार समितीचे आधुनिकीकरणकडे सरकारच्या माध्यमातून सर्व कृषी उत्पन्न समितीमध्ये संगणकीकरण करण्यात आले आहे. या संगणकीकरणामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना ठिकठिकाणीचे बाजार भाव समजणार आहेत. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सदस्यांसाठी संगणकीकरणाच्या कार्यशाळेचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले होते.

या कार्य शाळेचे उद्‌घाटन अप्पर जिल्हाधिकारी सुभाष डुंबरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मंत्रालयातील माहिती अधिकारी हुसेन अली, नोडल ऑफिसर श्री. लोखंडे उपस्थित होते. महाराष्ट्र राज्यात एकुण २१५ बाजार समित्या आहेत.

यापैकी पहिल्या दहा नंतर ५४ व नंतर १०० अशा एकुण १६४ बाजार समितीमध्ये संगणक बसविण्यात आले आहेत. उर्वरित बाजार समितीमध्ये लवकरच संगणक बसविण्यात येणार असल्याची माहिती श्री. हुसेन यांनी दिली.

कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे संपूर्ण संगणकीकरण करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य आहे. या संगणकीकरणामुळे शेतकऱ्यांना फायदा होणार असून आपल्या शेतमालाला कुठे किती भाव मिळेल याची माहिती उपलब्ध होणार आहे.

जिल्ह्यातील अलिबाग, कर्जत व रोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य आजच्या कार्यशाळेत सहभागी झाले आहेत. अशा प्रकारच्या कार्यशाळेचे आयोजन बीड, नाशिक, व यवतमाळ येथेही आयोजित करण्यात येणार आहेत.

Inauguration of AGMARKNET Workshop by Addl. District Collector Shri Subhash Dumbare on 22-11-2004 at NIC Raigad printed in Marathi daily **LOKASATTA (Mumbai Edition) dt. 25-11-2004.**

दैनिक, लोकसत्ता
मुंबई
दि. २५/११/०४

# संगणकांद्वारे बाजार समित्या जोडण्यास प्रारंभ

**अलिबाग, २४ नोव्हेंबर/प्रतिनिधी**

ॲगमार्कनेट योजनेंतर्गत बाजार समित्यांचे संगणकीकरण करण्यात येत असून, शेतकऱ्यांच्या शेतमालास रास्त भाव मिळवून देण्यासाठी शेतीमालाची दैनिक आवक व बाजारभाव यांची देवाणघेवाण करून एका बाजार समितीस इतर बाजार समित्यांचे बाजार भाव उपलब्ध करुन देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सूचना विज्ञान अधिकारी मोईझ हुसेन यांनी येथे केले.

अलिबाग येथे या संगणक प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सूचना केंद्राच्या रायगड कार्यालयाने केले असून या व्यतिरिक्त दोन प्रशिक्षण सत्रे २९ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत. या प्रशिक्षण सत्राचे उद्‌घाटन रायगड जिल्ह्याचे अप्पर जिल्हाधिकारी सुभाष डुंबरे यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी मोईझ हुसेन अली हे प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

ॲगमार्कनेट योजनेंतर्गत राज्यातील १६४ बाजार समित्यांना विनामूल्य संगणक संच उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तिसऱ्या टप्प्यात संगणक प्राप्त झालेल्या १०० बाजार समित्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी तीन दिवसांच्या संगणक प्रशिक्षण कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय सूचना केंद्र अलिबाग यांच्या कार्यालयात करण्यात आली आहे.

अशा प्रकारची १० प्रशिक्षण सत्रे राज्यात नाशिक, बीड व यवतमाळ येथे आयोजित करण्यात येत आहेत. यातील पहिल्या प्रशिक्षणासाठी रायगड जिल्ह्यातील अलिबाग, कर्जत, रोहा, ठाणे जिल्ह्यातील वसई, भिवंडी व सोलापूर जिल्ह्यातील करमाळा, कुर्डुवाडी, मंगळवेढा या बाजार समित्यांचा समावेश करण्यात आला आहे.

याप्रसंगी ॲगमार्कनेट योजनेचे नोडल ऑफिसर एम. एल. लोखंडे, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे व एन. आय. सी. मुंबईचे समन्वयक पी. एस. सुरावर, रायगड जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी सी. एम. मिश्रा, ठाणे जिल्हा सूचना विज्ञान सहाय्यक बी. के. गांधी, सोलापूर जिल्हा सूचना विज्ञान सहाय्यक उत्कर्ष होन कोळसे, रायगड जिल्हा सूचना विज्ञान सहाय्यक गजानन ठाकरे, तसेच पणन मंडळाचे प्रोग्रॅमर्स व्ही. व्ही. जगदाळे, के. एल. टांगरे, व नाशिक विभागीय व्यवस्थापक ए. पी. पाटील हे उपस्थित होते. ■




**अलिबाग येथे ॲगमार्कनेट योजनेंतर्गत संगणक प्रशिक्षण कार्यक्रमाच्या प्रशिक्षणाच्या प्रारंभप्रसंगी अप्पर जिल्हाधिकारी सुभाष डुंबरे दीप प्रज्वलन करीत असून, बाजूला राज्याचे सूचना विज्ञानचे अधिकारी हुसेनअली, एम. एल. लोखंडे, अलिबागचे जिल्हा सूचना अधिकारी सी. एम. मिश्रा.**

## 2) AGMARKNET Workshop at NIC Nashik.

Inauguration of **AGMARKNET Workshop** by District Collector Shri Mahesh Zagade on 29-11-2004 at NIC Nashik printed in Marathi daily **Gavkari (Nashik) dt. 01-12-2004.**

### 'ॲगमार्कनेट' योजनेंतर्गत प्रशिक्षणास प्रारंभ

नाशिक (वार्ताहर):- प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतमालास रास्त भाव मिळवून देण्यासाठी सर्व बाजार समित्यांमध्ये इतर बाजार समितीचे भाव उपलब्ध करून देणाऱ्या 'ॲगमार्कनेट' योजनेचा शुभारंभ करण्यात आला आहे. योजनेंतर्गत बाजार समित्यांचे संगणकीकरणाचे जाळे तयार करून त्याच्या संगणक प्रशिक्षण कार्यक्रमासाठी जिल्हाधिकारी महेश झगडे यांच्या हस्ते प्रारंभ झाला.

डायरेक्टर ऑफ मार्केटिंग ॲण्ड इन्सेक्शन व राष्ट्रीय सूचना केंद्र सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने महासंचालक डॉ. एन. विजयादित्य व उप महासंचालक, एन. आय. सी. दिल्ली एम. मोनी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात ॲगमार्कनेट ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेची अमलबजावणी करण्यासाठी पुण्यातील महाराष्ट्र राज्य कृषीपणन मंडळ, संस्थेची नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

ॲगमार्कनेट योजनेंतर्गत बाजार समित्यांचे संगणकीकरण करून जाळे तयार करण्यात येत आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालास रास्त भाव मिळवून देण्यासाठी शेतमालाची दैनिक आवक व बाजार भाव यांची देवाणघेवाण करून एका बाजार समितीस इतर बाजार समित्यांचे बाजार भाव उपलब्ध करून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. ॲगमार्कनेट योजनेंतर्गत राज्यातील १६४ बाजार समित्यांना तीन टप्प्यात विनामूल्य संगणक संच उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तिसऱ्या टप्प्यात संगणक प्राप्त झालेल्या १०० बाजार समित्यांचे कर्मचाऱ्यांसाठी तीन दिवसांच्या संगणक प्रशिक्षण कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, नाशिक कार्यालयात करण्यात आली आहे.

अशा प्रकारची १० प्रशिक्षण सत्रे राज्यात नाशिक, रायगड, बीड व यवतमाळ येथे आयोजित करण्यात आली. नुकतेच प्रथम प्रशिक्षणाचे आयोजन नाशिक राष्ट्रीय सूचना-विज्ञान केंद्राने केले असून या प्रशिक्षण सूत्राचे उद्घाटन जिल्हाधिकारी महेश झगडे यांच्या हस्ते व जिल्हा उपनिबंधक बाजीराव शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. याप्रसंगी जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी राजेश साळवे, ॲगमार्कटनेट योजनेचे नोडल ऑफिसर महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे, एम. एल.व एंन. आय. सी. मुंबईचे समन्वयक पी. एस. सुरावार, नंदुरबार जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी कोटकर, जळगाव जिल्हा सूचना विज्ञान सहाय्यक गुजर, नाशिक जिल्हा सूचना विज्ञान सहाय्यक श्रीमती शुक्ल तसेच पणन मंडळाचे व्ही. व्ही. जगदाळे व नाशिक विभागीय व्यवस्थापक ए. पी. पाटील हे उपस्थित होते.

◆ काठमांडू :-माओवाद्यांचा प्रश्न हाताळण्यासाठी भारत व नेपाळ यांनी संयुक्तपणे काम करण्याची गरज परराष्ट्र सचिव राव इंद्रजित सिंग यांनी येथे व्यक्त केली.

Inauguration of **AGMARKNET Workshop** by District Collector Shri Mahesh Zagade on 29-11-2004 at NIC Nashik printed in Marathi daily **Sakal (Nashik) dt. 02-12-2004.**

### 'ॲगमार्कनेट' योजनेस सुरवात

जेल रोड, ता. १ (बातमीदार) : 'डायरेक्टर ऑफ मार्केटिंग ॲण्ड इन्सेक्शन' व भारत सरकारचे 'राष्ट्रीय सूचना केंद्र' यांच्यातर्फे राज्यात 'ॲगमार्कनेट' ही योजना राबविण्यात येत असून, तिच्या अंमलबजावणीसाठी पुणे येथील 'महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ' या संस्थेची 'नोडल एजन्सी' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

नवी दिल्ली येथील 'एन.आ.सी.'चे महासंचालक डॉ. एन विजयादित्य व उपमहासंचालक एम. मोनी यांच्या मार्गदर्शनाखालील या योजनेसाठी एकूण दहा प्रशिक्षणसत्रे राज्यात नाशिकसह रायगड, बीड व यवतमाळमध्ये होणार आहेत.

'राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र' येथे जिल्हाधिकारी महेश झगडे यांच्या हस्ते प्रथम प्रशिक्षण सत्राचे उद्घाटन नुकतेच झाले. श्री. शिंदे, जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी राजेश साळवे, तसेच एम. एल. लोखंडे, पी. एस. सुरावार, श्री. कोटकर, श्री. गुजर, श्रीमती शुक्ल, व्ही. व्ही. जगदाळे, ए. पी. पाटील उपस्थित होते. शेतमालास रास्त भाव मिळवून देण्यासाठी शेतमालाची दैनंदिन आवक व बाजारभाव यांची देवाण-घेवाण करून एका समितीला इतर बाजार समित्यांचे बाजारभाव उपलब्ध करून देणे, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. त्यासाठी राज्यातील १६४ बाजार समित्यांना तीन टप्प्यांत विनामूल्य संगणक संच उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

## 3) AGMARKNET Workshop at NIC Beed.

Inauguration of **AGMARKNET Workshop** by District Collector Shri Nandkumar Jantre on 06-12-2004 at NIC Beed printed in Marathi daily ZunZhar Neta **(Beed) dt. 07-12-2004.**

# बाजार समित्यांनी शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करावे : जंत्रे

बीड, दि.६ (प्रतिनिधी):- बदलत्या युगात माहिती तंत्रज्ञानाची कास धरुन बाजार समित्यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी कार्य करणे आवश्यक आहे, असे मत जिल्हाधिकारी नंदकुमार जंत्रे यांनी व्यक्त केले.



जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्रामध्ये (एनआयसी) औरंगाबाद विभागातील बाजार समित्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी तीन दिवसांच्या संगणक प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमास लातूरचे विभागीय सहनिबंधक डी.बी.मुकणे, जिल्हा उपनिबंधक शंकर वाडेकर, मुंबईचे एनआयसी समन्वयक पी.एस.सुरावार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.पुरुषोत्तम पाटोदेकर, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे व्ही.व्ही.जगदाळे, जिल्हा माहिती अधिकारी राजेंद्र सरग हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री.जंत्रे म्हणाले कृषी उत्पन्न बाजार समित्या शेतकऱ्यांच्या हितासाठी कार्य करत असतात. प्रत्येक शेतकऱ्याला प्रत्येक ठिकाणच्या बाजारपेठेतील चढ-उतार माहीत होणे आवश्यक आहे. वृत्तपत्रातील बाजारभावावरुन अनुमान काढणे अवघड असते. बाजारपेठेतील आवक कशी आहे, किंमती कमी झाल्या की वाढल्या या बाबतची माहिती उपलब्ध होणे आणि त्याचा शेतकऱ्यांना फायदा मिळवून देणे ही समितीची जबाबदारी आहे असे सांगून ते म्हणाले नवे तंत्रज्ञान स्वीकारण्याची आपली

**बाजार समित्यांनी शेतकऱ्यांच्या....**

मानसिकता नसते, ती बदलण्याची गरज आहे. आज शेतकरी जागा होतो आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या, दूरसंचार क्षेत्रात प्रचंड क्रांती झाली आहे. शेतकऱ्याला अद्ययावत माहिती हवी आहे. हे आव्हान असून ते सर्वांनी स्वीकारण्याची गरज आहे, असेही ते म्हणाले.

प्रारंभी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सूचना विज्ञान अधिकारी प्रविण चोपडे यांनी केले. केंद्र सरकारच्या डायरेक्टर ऑफ मार्केटिंग अँड इन्स्पेक्शन आणि राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राच्या संयुक्त विद्यमाने राज्यात ॲगमार्कनेट ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी पुण्याच्या महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाची नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ॲगमार्कनेट योजनेखाली बाजार समित्यांचे संगणकीकरण करून जाळे तयार करण्यात येत आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालास रास्त भाव मिळवून देण्यासाठी शेतमालाची दैनिक आवक व बाजार भाव यांची देवाणघेवाण करुन एका बाजार समितीस इतर बाजार समित्यांचे बाजारभाव उपलब्ध करुन देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. याच योजने अंतर्गत राज्यातील १६४ बाजार समित्यांना तीन टप्प्यात विनामुल्य संगणक संच उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. तिसऱ्या टप्प्यात संगणक प्राप्त झालेल्या औरंगाबाद विभागातील १९ बाजार समित्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी तीन दिवसांच्या संगणक प्रशिक्षण कार्यक्रमाची सुरुवात ६ डिसेंबर पासून झाली असून ते तीन दिवस चालणार आहे. हे प्रशिक्षण दोन गटात होणार असून दुसऱ्या गटाचे प्रशिक्षण १३ डिसेंबर रोजी सुरु होणार आहेत.

यावेळी एनआयसीचे जिल्हा सूचना विज्ञान सहाय्यक सुनील खुळे, औरंगाबादचे जिल्हा सूचमा विज्ञान सहाय्यक ए.आर.थोरात, जालन्याचे जिल्हा सूचना विज्ञान सहाय्यक के.बी.कोंडेकर, मंगेश हंसे आदी उपस्थित होते.

## 4) AGMARKNET Workshop at NIC Yavatmal.

Inauguration of **AGMARKNET Workshop** by SIO Maharashtra

१२ देशोन्नती

# 'ॲगमार्कनेट' योजनेमुळे शेतकऱ्याला देशभरातील बाजारभाव उपलब्ध होणार - जिल्हाधिका[…]

*विशेष प्रतिनिधी/३० डिसेंबर*

यवतमाळ : ॲगमार्कनेट ही भारत सरकारच्या कृषी मंत्रालयाची महत्त्वाकांक्षी योजना असून याचा उद्देश शेतकऱ्याला त्याच्या शेतमालाला चांगला भाव मिळवून देणे हा आहे. या योजनेअंतर्गत विकसित करण्यात आलेल्या सॉफ्टवेअरद्वारे शेतकऱ्याला घरबसल्या देशभरातील बाजार भावाची माहिती मिळेल व त्याला परवडेल अशा, ठिकाणी तो आपला माल विकू शकेल असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. हर्षदीप कांबळे यांनी येथील जिल्हा सूचना विज्ञान केंद्रात आयोजित एका प्रशिक्षण कार्यक्रमात बोलतांना केले. राज्य सूचना विज्ञान अधिकारी मोईज हुसेन हे उद्‌घाटक म्हणून उपस्थित होते.

विदर्भातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रतिनिधींना प्रस्तुत सॉफ्टवेअरचे प्रशिक्षण देण्याकरिता या आयोजित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे ठिकाणी शेतकऱ्यांसाठी एन.आय.सी. च्या मदतीने हे सॉफ्टवेअर उपलब्ध करून देण्याच्या 'लोकाभिमुख कार्यक्रमाचा अंगीकार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य' असल्याची माहिती राज्याचे सूचना विज्ञान अधिकारी मोईज हुसेन यांनी दिली. आजतागायत महाराष्ट्र राज्यातील एकूण १६४ कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यालयातून संगणकाद्वारे ही योजना चालू असून संपूर्ण भारत देशात सर्वात जास्त केंद्र महाराष्ट्रात (१६४) त्या खालोखाल पंजाब(१५०) व गुजरात (१४०) केंद्रामध्ये ही योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. महाराष्ट्रामध्ये ही योजना तीन टप्प्यात राबविण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात १० कृषी उत्पन्न बाजार समितीचे, दुसऱ्या टप्प्यात ५४ कृषी उत्पन्न बाजार समितीचे संगणकीकरण करण्यात आले असून तिसऱ्या टप्प्यात १०० कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे संगणकीकरण करण्यात येत आहे.

यवतमाळ जिल्ह्यात १६ कृषी उत्पन्न बाजार समित्यांपैकी ९ चे संगणकीकरण पूर्ण झाले आहे. या योजनेअंतर्गत वेबसाईटवर भारतातील सर्व बाजार पेठेमधील दैनंदिन शेतमालाचे बाजारभाव व आवक याची माहिती शेतकरी व सामान्य जनतेला मिळू श[…]

या योजनेअंतर्गत विदर्भास[…] प्रशिक्षण राष्ट्रीय सूचना विज्ञान […] यवतमाळ येथे तीन टप्प्यात आयो[…] करण्यात आले. यवतमाळचे जि[…] सूचना विज्ञान अधिकारी अरुण र[…] यांनी प्रशिक्षण यशस्वी करण्याक[…] समन्वयाची भूमिका परिश्रम पूर्वक[…] पाडली. या योजनेअंतर्गत कृषी […] बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांना […] २९ डिसेंबर पर्यंतच्या या तीन दि[…] प्रशिक्षणाकरिता मार्गदर्शन राव […] सूचना विज्ञान असोसियटस् अ[…] महेश पत्की जिल्हा सूचना […] असोसियटस् बुलडाणा, संजय […] जिल्हा सूचना विज्ञान आसो[…] चंद्रपूर, संजय जगताप जिल्हा […] विज्ञान असोसियटस् यवतमाळ […] महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे […] दर्डा व प्रशांत नारखेडे हे मार्गदर्शक […] उपस्थित होते.




*यवतमाळ : ॲगमार्कनेट कार्यशाळेत विचार मांडतांना राज्य सूचना विज्ञान अधिकारी मोईज हुसेन सोबत जिल्हाधिकारी डॉ. हर्षदीप कांबळे, रणवीर व इतर*

**AGMARKNET Workshop** at NIC Yavatmal



# 'ॲगमार्कनेट' योजनेत शेतकऱ्यांना घरबसल्या कळतील कृषी मालाचे भाव

## राज्यातील २७५ कृउबा समित्यांचे संगणकीकरण

▶ नितीन पखाले

यवतमाळ, दि. ३० - माहितीच्या अभावामुळे शेतकरी अनेकदा आपल्या कृषीमालाची विक्री कवडीमोल भावात करतात. कित्येकवेळा बाजार समित्यांमधील दलाल भावाच्या बाबतीत शेतकऱ्यांची फसवणूकही करतात. परंतु आता 'ॲगमार्कनेट योजने'मुळे शेतकऱ्यांची ही समस्या दूर होणार आहे. देशातील कुठल्याही कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधील कृषी मालाचे भाव शेतकऱ्यांना घरबसल्या कळणार असल्याने शेतकरी त्याला वाटेल तेथे आपल्या मालाची विक्री करू शकतील.

ॲगमार्कनेट ही योजना भारत सरकारच्या कृषी मंत्रालयाची महत्त्वाकांक्षी योजना आहे. देशातील महत्त्वपूर्ण कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये एनआयसीच्या मदतीने शेतकऱ्यांसाठी ॲगमार्कनेटचे खास सॉफ्टवेअर विकसित करण्यात आले आहे. या सॉफ्टवेअरमुळे देशातील कुठल्याही बाजार समित्यांतील कृषीमालाच्या भावाची शेतकऱ्याला इंटरनेटद्वारे काही सेकंदात माहिती मिळणार आहे. याशिवाय मोबाईल, एस.एम.एस. आणि दूरध्वनीद्वारेसुद्धा बाजारभाव उपलब्ध होणार आहे, अशी माहिती या योजनेचे महाराष्ट्र राज्य समन्वयक प्रवीण सुरावार यांनी दिली.

महाराष्ट्रात २७५ कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधून ही योजना राबविण्यात येणार आहे. आतापर्यंत १६४ बाजार समित्यांमधून ही योजना



कार्यान्वित झाली असून चौथ्या टप्प्यात १११ बाजार समित्यांमध्ये ही योजना सुरू होणार आहे. देशात आत्तापर्यंत सर्वाधिक १६४ महाराष्ट्रात त्याखालोखाल पंजाबमध्ये १५० आणि गुजरातमध्ये १४० केंद्रामध्ये ॲगमार्कनेट योजना कार्यान्वित झाली आहे.

या योजनेंतर्गत www.agmarknet.nic.in या संकेत स्थळावर भारतातील सर्व बाजारपेठांमधील दैनंदिन शेतमालाचे बाजारभाव व आवक याची माहिती शेतकऱ्यांना कळणार आहे. यवतमाळ जिल्ह्यातील यवतमाळ, वणी, पुसद, दारव्हा, दिग्रस, घाटंजी, महागाव, पांढरकवडा, उमरखेड येथील बाजार समित्यांमध्ये ही योजना सुरू करण्यात आली आहे.

याप्रकारे लोकाभिमुख कार्यक्रमाचा अंगीकार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे, अशी माहिती राज्याचे सूचना विज्ञान अधिकारी मोईज हुसेन यांनी यवतमाळ येथे आले असता दिली. संगणकीकरणाच्या सहाय्याने शेतमालाला योग्य भाव मिळाल्यास शेतकऱ्याची बिकट अवस्था दूर होईल, असा विश्वास जिल्हाधिकारी डॉ.हर्षदीप कांबळे यांनी व्यक्त केला. या योजनेंतर्गत यवतमाळ येथील राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्रात नुकतीच तीन दिवसीय विदर्भस्तरीय प्रशिक्षण कार्यशाळा पार पडली, अशी माहिती जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी अरुण रणवीर यांनी दिली.

देशातील एकूण ७,३०० मोठ्या बाजार समित्यांपैकी २७३५ बाजार समित्यांमध्ये ॲगमार्कनेटची ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. बाजारभावांशिवाय अत्याधुनिक शेती तंत्राबाबतही या योजनेत शेतकऱ्यांना माहिती देण्यात येणार आहे. शेतकरी सामूहिकरित्यासुद्धा या योजनेचा गावपातळीवर लाभ घेऊ शकतात. योजना लोकाभिमुख असली तरी ती शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी मात्र शासनाला परिश्रम घ्यावे लागणार आहे.